## वैदिक कालखंड

संपूर्ण वैदिक साहित्याच्या रचनेसाठी व संकलनासाठी कित्येक शतके लागली असावीत. या काळात आर्याच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक,धार्मिक, सांस्कृतिक जीवनालाही आकार प्राप्त होत होता. हा काळ सामान्यतः इ.स.पू.2500 ते इ.स.पू. २०० हा गृहीत धरला जातो. यालाच वैदिक काळ म्हणतात. या प्रदीर्घ वैदिक काळाचे आपण अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने दोन भाग करू शकतो. १) ऋग्वेद किंवा पूर्व वैदिककाळ २) उत्तर वैदिककाळ इ.स.पू. २५०० ते इ.स.पू. १२०० या केळेत ऋग्वेदाची रचना झाली म्हणून या काळाला ऋग्वेदकाळ किंवा पूर्व वैदिककाळ म्हणतात. इ.स.पू. १२०० ते इ.स.पू. २०० या कालखंडात इतर वेद व वैदिक साहित्य रचले गेले. या कालखंडाला उत्तर वैदिककाळ म्हणतात.

ऋग्वेद काळ किंवा पूर्व वैदिक काळ ऋग्वेद काळात आर्य सप्तसिंधू प्रदेशात स्थायिक झाले. या काळातील त्यांचे जीवन पुढीलप्रमाणे होते.

**१) राजकीय जीवन**

आर्यांचा जसजसा विस्तार व विकास होऊ लागला तसतशा आवश्यकतेनुसार त्यांनी राजकीय व सामाजिक संस्था निर्माण केल्या.

**कुटुंब किंवा कूळ-**

राजकीय किंवा सामाजिक संस्थेचा सर्वात लहान घटक म्हणजे 'कुटुंब'. सामान्यतः कुटुंबात तीन पिढ्यांचे लोक एकत्र राहत. आर्यसंस्कृती पुरुषप्रधान असल्याने कुटुंबातील सर्वात वयोवृद्ध पुरुष कुटुंबप्रमुख असे. त्याला कुलपती म्हणत. त्याचा अधिकार संपूर्ण कुटुंबावर चालत असे. कुटुंबाचे पालनपोषण, संरक्षण,वादांचा निकाल लावणे, संपत्तीचे वाटप करणे इ. त्याची कामे होती.

**ग्राम –**

काही कुटुंबे मिळून ग्राम बनत असे. ग्रामप्रमुखाला 'ग्रामणी' म्हणत. त्याला धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रात मार्गदर्शन करण्यासाठी ग्रामोपाध्याय असे. ग्रामातील काही लोकांची मिळून ग्रामपंचायत बनत असे. ती न्यायदानाचे काम करी. ग्रामाचा सर्व कारभार ग्रामणी पाहत असे.

**विश-**

काही खेडी मिळून विश बनत असे. विशचे स्वरूप आधुनिक तालुक्याप्रमाणे होते. विशप्रमुखाला 'विशपती' म्हणत.

**जन किंवा गण –**

काही विश मिळून जन, गण किंवा जनपद बनत असे. प्रत्येक जनाचा एक नायक असे. त्याला राजा, गोप किंवा गणपती म्हणत. त्याची सत्ता जनातील सर्व लोकांवर चाले.युद्धे चालत. यातूनच साम्राज्य, सम्राट या कल्पना उदयाला येऊन जनपदे मागे पडली. या काळात अनेक जन किंवा गण होते. त्यांची अनार्यांशी व आपापसात सतत प्रत्येक टोळीची स्वतंत्र शासनव्यवस्था असे.

**राजा –**

ऋग्वेदकाळात आर्य टोळ्या करून राहत. टोळीप्रमुखाला राजन म्हणत प्रत्येक टोळीचा स्वतंत्र शासन व्यवस्था असे. लोकांनी निवडून दिल्यामुळे अधिकारपदावर येई. राजाची निवड करताना शौर्य पराक्रम या दोन गुणांना प्रामुख्याने विचार केला जाई. राज्याभिषेकाच्या मंत्र म्हटले जात. यावरून राजपदाचे महत्त्व लक्षात येते. राजपद है निरंकुश नसून त्यावर अनेक बंधने होती. त्या बंधनांचा राजा आदर करीत असे. अकार्यक्षम राजा राजपदावरून दूर करण्याचा प्रजेला अधिकार असे.

**राजाची कर्तव्ये**

राज्याभिषेकाच्या वेळी राजाला अनेक शपथा ध्या त्यात लोकहिताची भावना सर्वश्रेष्ठ असे लोकहिताच्या भावनेचा अनादर करण राजाला राजपदावर क्षणभरही राहण्याचा अधिकार नसे.आर्य सप्तसिंधू प्रदेशात स्थायिक झाल्यानंतर त्याच्या वसाहतीकरणाला झाली. या प्रक्रियेत त्यांची आपापसात व अनायाशी युद्ध होऊ लागली. विशेष अनार्यांशी लढताना त्यांना नायकाची आवश्यकता भासू लागली. या आवश्यकतेतूनच 'राजा' या पदाची निर्मिती झाली. अंतर्गत बंडाळ्या व बाह्य आक्रमण यापासून प्रज रक्षण करणे, तिच्या हितसंबंधांची काळजी घेणे, न्यायदान करणे इ. त्याची कर्तव् निश्चित करण्यात आली. ही कर्तव्ये त्याला धर्माच्या व नियमांच्या चौकटीत राहूनव पार पाडावी लागत. राजा धर्मानुसार राज्यकारभार करतो किंवा नाही हे पाहण्यासाठी तसेच त्याला धार्मिक बाबतीत सल्ला देण्यासाठी पुरोहित असे."राजाने प्रजेने उत्तरदायित्व स्वीकारल्याने त्याला स्वतः च्या उदरनिर्वाह करण्यास वेळ मिळत नसे कारण तो दिवसातील चोवीस तास त्याच्या कर्तव्यात मम असे. त्यामुळे त्याच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी प्रजेने उचलण्याची कल्पना पुढे आतं व त्यातूनच प्रजा राजाला सुवर्ण, दासदासी, गायी, धान्य इ. करांच्या किंवा नजराण्याच्या रूपात देऊ लागली. पराभूत राजाकडून मिळणारी खंडणी आणि

युद्धातील लूट हि  राजालाच मिळत असे. ऋग्वेदांत वर्णन केल्याप्रमाणे राजा हा हजारो खाबांच्या राजप्रासादातून राहत असे. सारांशरूपाने राजाची राहणी अत्यंत ऐश्वर्यपूर्ण असून तो समाजात सर्वाधिक प्रतिष्ठित व पूजनीय असे.

**राजाचे प्रमुख अधिकारी**

राजाला राज्यकारभारात मदत करण्यासाठी पुढील अधिकारी असेत.

**पुरोहित –**

पुरोहित हा राजाचा प्रमुख सल्लागार होता. राजावर धर्मानुसार राज्यकारभार करण्याचे बंधन असल्यामुळे राजा हा धर्मानुसार राज्यकारभार करतो किंव नाही हे पाहण्याची जबाबदारी पुरोहिताची असे. पुरोहिताचे धार्मिक क्षेत्रातील एकमेवाद्वितीय असल्याने त्याचा राजावर जबरदस्त प्रभाव असे. राजाला युद्धात मिळावा म्हणून पुरोहित मंत्र म्हणत असे यज्ञ करीत असे. प्रसंगी रणांगणावर राजा सोबतही करीत असे. तो राजाचा धार्मिक व राजकीय सल्लागार म्हणजे एक मित्रच असे राज्यात राजाच्या खालोखाल पुरोहिताचा मान असे.

**सेनानी**

पुरोहिताच्या खालोखाल राज्यात सेनानीचे स्थान असे. राजानंतर त्याचाच सैन्यावर सर्वोच्च अधिकार असे. सैन्यात शिस्त राखणे, युद्धप्रसंगी सैन्याचे संचलन करणे व राजाला सल्ला देणे इ. याची कर्तव्ये होती. शांततेच्या काळात राज्यात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम सेनानी करीत असे.

**सभा आणि समिती**

राजाला राज्यकारभारात सल्ला देण्यासाठी सभा आणि समिती या दोन संस्था होत्या. या संस्थांचे स्वरूप नेमके काय होते याविषयी वाद आहेत.

**सभा**

लुडविगच्या मते सभेचे स्वरूप वरिष्ठ सभागृह (Upper House) सारखे होते. तर जिमरच्या मते ही ग्रामसंस्था होती. ऋग्वेदातील वर्णनानुसार सभेत योवृद्ध, ज्ञानवृद्ध, अनुभवी व धनसंपन्न लोकांचा समावेश असे..

**समिती –**

लुडविगच्या मते समितीचे स्वरूप कनिष्ठ सभागृहासारखे (Lower House) होते तर जिमरच्या मते ती केंद्रीय संस्था होती. राजा समितीचा प्रमुख असे. ऋग्वेदातील एका उल्लेखानुसार राजा समितीला उद्देशून एके ठिकाणी म्हणतो, "मी तुमच्या मतांशी सहमत आहे.” समितीत संपूर्ण राज्याचे प्रतिनिधी असत

या दोन्ही संस्थांचे नेमके स्वरूप, त्यांची सदस्यसंख्या, कार्यकाल, अधिकार, निवडपद्धती याविषयी पुरेशी माहिती नाही. राजाची निवड करण्याचे तसेच प्रसंगी न्यायदान व प्रशासनाचे अधिकार या संस्थांना असावेत. एक गोष्ट निश्चित की राजाच्या अधिकारावर अंकुश ठेवण्याचे काम या संस्था करीत असाव्यात. त्यामुळे राजाही या संस्थांचा मान ठेवीत असे.

**कायदा व न्याय**

ऋग्वेदकाळात धर्म हाच कायदा होता. त्याही काळी खून, दरोडे, चोरी लांडीलबाडी इ. गुन्हे होत असत. ग्रामातील गुन्ह्यांचा निकाल 'मध्यमासी' (मध्यस्थ) मार्फत दिला जाई. गुन्हेगारांना कडक शासन केले जाई. 'वैरादेय' व 'शतदेय' या दोन प्रकारच्या शिक्षा असत. घेतलेले कर्ज वेळेवर न फेडल्यास गुलामगिरी वाट्याला येई. कायदा हा परंपरेवर व परंपरा धर्मावर आधारित होती. राजा पुरोहिताच्या साह्याने न्यायदान करी. पुष्कळदा सभाही न्यायदानाचे काम करी.

**युद्धकला**

आर्य आणि युद्ध यांचे अतूट नाते होते. युद्ध हे आत्मरक्षा, लूट व शत्रूवर विजय मिळविण्यासाठी लढले जाई. आर्यांची आपापसात व अनार्यांशी सतत युद्धे चालत. शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी पुरांचा आश्रय घेतला जाई पर हे दगडांचे त्याला तटबंदी असे सैन्य नियमित नसून गरज पडल्यास सर्वच असून युद्धात भाग घेत असे. युद्धात पदाती (पायदळ) आणि रथी राहत. पदाती हा सामान्य सैनिक असे व तो कोणत्याही वाहनाशिवाय लढत असे. राजा व त्याचे अधिकारी प्रजा धनुष्यबाण, तलवार, गदा, परशू, भाला, गोफण इ. प्रमुख शस्त्रे होती. ऋग्वेदात दोन दोन, तीन, , चार घोड्यांच्या रथात बसून लढत. युद्धात हत्तीचा उपयोग होत नसावा.  आर्य युद्धात कवच व शिरस्त्राणाचा वापर करीत. ऋग्वेदात 'पुर चिरष्णु' असा उल्लेख आहे. ते पुर जिकण्याचे साधन असावे. युद्धात सैनिकांचा उत्साह वाढावा म्हणून ढोल, नगारे, तुताऱ्या इ. रणवाद्यांचा उपयोग करीत. कदाचित सोमरसाचेही पान होत असावे. युद्धावर जाण्यापूर्वी देवतांचा आशीर्वाद घेतला जाई. युद्धात जय मिळावा म्हणून पुरोहित मंत्र म्हणत व यज्ञ करीत.

**२) सामाजिक जीवन**

योग्य भूमीच्या शोधात भटकत असताना आर्य भारतात आले व सप्तसिंधूच्या प्रदेशात स्थायिक झाले. त्यांना स्थैर्य लाभताच त्यांच्या सामाजिक जीवनात आमूलाग्र बदल घडून आला. त्यांच्या सामाजिक जीवनाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**कुटुंबसंस्था** –

कुटुंब हा सामाजातील सर्वात लहान घटक असून त्यात साधारणपणे तीन पिढ्यांचे लोक एकत्र राहत. कुटुंबातील सर्वात वयोवृद्ध पुरुष कुटुंबप्रमुख राहत असे त्याला कुलपती किंवा गृहपती म्हणत. कुटुंबाचे पालनपोषण, संरक्षण, शिस्त, मिळकतीची योग्य वाटणी इ. याची जबाबदारी असे. कुटुंबातील सदस्यांचे संबंध परस्पर स्नेहाचे असत. कुटुंबात कुलपतीचा शब्द अंतिम मानला जाई. त्याच्या आज्ञेचे उल्लंघन करणाऱ्या सदस्यास कडक शासन केले जाई. गृहपतीच्या पत्नीलाही कुटुंबात अत्यंत सन्मानाने वागविले जाई. गृहपती व त्याची धर्मपत्नी मिळून कुटुंबातील सर्व धार्मिक जबाबदाऱ्या पार पाडत. एकत्र कुटुंबपद्धतीमुळे मोठ्यांविषयी आदर, समवयस्कांप्रती स्नेह आणि लहानांप्रती प्रेम या गुणांची कुटुंबात जोपासना होई.

**स्त्रीचे स्थान** –

पुरुषप्रधान समाजव्यवस्था असल्याने व स्त्री ही निसर्गतःच अबला असल्याने तिचे स्थान दुय्यम होते. विवाहापूर्वी पित्यावर, विवाहानंतर पतीवर व पतीच्या मृत्यूनंतर तिला मुलावर अवलंबून राहावे लागे. गृहकृत्य, अपत्यसंगोपन व पतीसेवा या तिच्या प्रमुख जबाबदाऱ्या होत्या. सामाजिक व धार्मिक प्रसंगात ती पुरुषाच्या बरोबरीने भाग घेत असे. परंतु कुटुंबाच्या मालमत्तेवर तिचा अधिकार पोहोचत नसे. सतीची चाल नव्हती. विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार होता. स्त्रीचे स्थान दुय्यम असले तरी ती उपेक्षित नव्हती. मुलीचा जन्म आपत्तीसूचक समजला जात नव्हता. स्त्री ही घराची सम्राज्ञी होती. ती गृहिणी, गृहस्वामिनी, सहधर्मचारिणी म्हणून संबोधली जाई. मुलांप्रमाणे मुलींचाही उपनयन संस्कार होत असे व त्यानंतर त्यांच्या शिक्षणाला सुरुवात होत असे. संसारासाठी आवश्यक त्या सर्व कलाचे तिला शिक्षण दिले जाई. ऋग्वेदात लोपामुद्रा, घोषा, सिकता इ. विदुषींचा उल्लेख आहे. त्यांनी ऋग्वेदातील काही सूक्ते रचली. त्या काळातील स्त्रियांचा काव्य, तत्त्वज्ञान, विज्ञान, युद्धशास्त्र इ.सर्वच क्षेत्रात संचार होताना दिसतो. पडदापद्धती नसल्याने त्या सर्व धार्मिक व सामाजिक कार्यक्रमात मुक्तपणे भाग घेत. त्यांचे आचरण अत्यंत आदर्श असून समाज त्यांच्याकडे अतिशय आदराने पाही.

**विवाहसंस्था**

विवाह हा एक धार्मिक व पवित्र संस्कार मानला जाई. कन्या सुमती झाल्यावर म्हणजे वयात आल्यावर तिचा विवाह होई. स्वतःचा पती निवडण्याचे तिला पूर्ण स्वातंत्र्य होते. आई-वडील व इतर वडीलधाऱ्या मंडळींच्या अनुमतीनेही विवाह होत. विवाहाच्यावेळी 'पाणिग्रहण' हा महत्त्वाचा विधी होत असे, देव, ब्राह्मण अग्नीच्या साक्षीने पती पत्नीचा हात हाती घेऊन तिला संसारातील सर्व सुखे देण्याची शपथ घेत असे. विवाहाच्या वेळी व विवाहानंतर पत्नीच्या चारित्र्याला अतिशय महत्त्व दिले जाई. सामान्यपणे एक पुरुष एकाच स्त्रीशी विवाह करी परंतु राजा व श्रीमंत लोक एकापेक्षा जास्त स्त्रियांशी विवाह करीत. शत्रू व दस्यू यांच्याशी विवाहसंबंध निषिद्ध मानला जाई.

**घरे** –

आर्य सप्तसिंधू प्रदेशात आले आणि त्यांच्या भटक्या जीवनाची इतिश्री झाली. त्यांनी स्थायिक होऊन घरात राहायला सुरुवात केली. गरीब बांबू व लाकडाच्या तर श्रीमंत दगड व विटांच्या घरात राहत. साधारणपणे तीन पिढ्यांचे लोक एका घरात राहत. प्रत्येक घरात बैठक खोली, भोजनगृह, स्त्रियांसाठी स्वतंत्र खोल्या, स्नानगृह असे. आर्य अग्निपूजक असल्याने प्रत्येक घरात अग्नी प्रज्वलित होत असे. त्यासाठी स्वतंत्र अग्निशाळा होती. आर्यवस्तीला तटबंदी असे.

**अन्न**

आर्य हे संमिश्र आहार घेत. त्यांच्या आहारात गहू, जव, तांदूळ, तीळ, उडीद, मूग, निरनिराळी फळे व भाज्या तसेच दूधदुभत्याचा समावेश असे. विशिष्ट प्रसंगी बकरी, बैल व यज्ञात बळी दिलेल्या पशूंच्या मांसाचा भोजनात वापर हेई. पशुबळीचे मांस प्रसाद म्हणून ग्रहण केले जाई. यज्ञ, धार्मिक विधी, विवाह, युद्ध या प्रसंगी सोम व वनस्पतीपासून तयार केलेल्या रसाचे पान होई. त्याला सोमरस गत सोमरसाच्या प्राशनाने अंगात वीरश्री संचारते तसेच यज्ञ करण्यास स्फूर्ती येते अशी श्रद्धा होती. विशिष्टप्रसंगी मद्यपान होई. परंतु मद्यपानाला प्रतिष्ठा नव्हती. कारण मद्यपान क्रोध व पापाचरणाला आमंत्रण देते अशी धारणा होती.

**वेशभूषा –**

आर्यांचा पोषाख अतिशय साधा होता. ते तीन प्रकारची वस्त्रे वापरत १) निवी - कमरेला गुंडाळण्याचे २) वासस - अंगावर घेण्याचे किंवा ३) अधिवास - डोक्यावरून घेण्याचे.कपडे सुती, गरम आणि रंगबेरंगी असत. आर्यांना वस्त्र शिवण्याची कला माहीत असावी. श्रीमंत लोक सोन्याच्या जरीचा कशिदा काढलेली वस्त्रे वापरीत. स्त्री व पुरुष यांच्या पोषाखात विशेष फरक नव्हता. ब्रह्मचारी फक्त कमरेभोवती मृगाजीन गुडाळत.

**केशभूषा**

स्त्री व पुरुष दोघेही लांब केस राखीत. स्त्रिया केसांच्या निरनिराळ्या रचना करीत तर पुरुष केसांचा जुडा बांधत. दोघेही डोक्यावर वस्त्र घेत.

**अलंकार व सौंदर्य प्रसाधने**

स्त्री-पुरुष दोघांनाही नटण्यामुरडण्याची हौस - होती. विवाह, सामाजिक व धार्मिक प्रसंगी निरनिराळ्या अलंकारांचा व प्रसाधनाचा विशेष वापर होई. कर्णभूषणाचे निरनिराळे प्रकार, गळ्यातील हार, बाजूबंद, मेखला, नूपुर, कंकण, मुद्रिका इ. अलंकारांचा वापर केला जाई. सोने, चांदी, हिरे, माणिक, मोती, शंख, शिपले यांच्यापासून अलंकार तयार केले जात.

**मनोरंजनाची साधने –**

आर्य मूलतः आनंदी वृत्तीचे होते. ऐहिक जीवनाचा जास्तीत जास्त आनंद लुटण्याकडे त्यांचा कल असे. त्यांच्या मनोरंजनाच्या निरनिराळ्या प्रकारांवरून त्यांच्या आनंदी वृत्तीची कल्पना येते. द्युत, रथांच्या शर्यती, प्राण्यांच्या झुंजी, मुष्टीयुद्ध, मल्लयुद्ध, शिकार, नृत्य, संगीत इ. त्यांचे करमणुकीचे प्रकार होते नृत्य व संगीत कार्यक्रमात स्त्री व पुरुष सामुदायिकरीत्या भाग घेत. संगीतासाठी मृदुग, ढोल, वीणा, झांज, घंटा, बासरी इ. वाद्यांचा उपयोग केला जाई. विशिष्टप्रसंगी जुगार खेळला जाई. परंतु त्याला समाजात प्रतिष्ठा नव्हती कारण त्यामुळे कर्जबाजारीपणा वाढतो अशी धारणा होती. प्राण्यांच्या झुंजी, मल्लयुद्ध इ. वीरश्री निर्माण करणारे प्रकार विशेष लोकप्रिय होते.

**नैतिक स्तर**

आर्यांच्या जीवनात नीतिमत्तेला अत्यंत महत्त्व होते. जीवनातील आनंदाचा उपभोग जास्तीत जास्त चांगल्या रीतीने घेण्याकडे त्यांचा कल असल्याने चोरी, दरोडे, खून, फसवाफसवी, व्यभिचार, बलात्कार इ. गुन्ह्यांचे प्रमाण अल्प होते. धर्माचरणी, सत्यभाषी यांना समाजात फार मान असे. अतिथीसत्कार पुण्यकर्म समजले जाई.

**३) आर्थिक जीवन**

आर्य भारतात टोळ्याटोळ्यांनी व एकामागून एक आले. ते सिंधू व तिच्या उपनद्यांच्या काठाकाठाने स्थायिक झाले. सुपीक जमीन व मुबलक पाणी यामुळे कमी श्रमात भरघोस उत्पन्न होऊ लागले. सुरुवातीला गरजा अल्प होत्या. त्या वाढू लागताच जीवनावश्यक वस्तूंची निर्मिती आवश्यक ठरली. त्यातूनच श्रमविभागणीचे तत्त्व अमलात आले हे श्रमविभागणीचे तत्त्व म्हणजेच आर्यांच्या आर्थिक जीवनाचा पाया होय.

**ग्रामीण जीवन**

आर्यसंस्कृती ही ग्रामीण संस्कृती होती. कृषि हा आर्यांचा मुख्य व्यवसाय असल्याने आर्य जेथे शेती करीत तेथे लहान खेडी तयार झाली. ग्रामणी नावाचा अधिकारी खेड्याचा कारभार पाहत असे.

**शेती व पशुपालन**

शेती हा आर्यांच्या आर्थिक जीवनाचा पाया होता. शेतीसाठी पशूची आवश्यकता असल्याने त्यांनी पशुधन वाढवायला सुरुवात केली. शेतीसाठी गाय व बैल आणि युद्धासाठी घोडा यांचा उपयोग होत असल्याने या प्राण्यांना आर्यांच्या जीवनात अतिशय महत्त्व प्राप्त झाले. गायीपासून शेतीसाठी बैल मांस खाणे निषिद्ध मानले जाऊ लागले. गाय ही संपत्तीचे साधन बनली व गोधनासाठी तसेच दूध, दुधाचे पदार्थ मिळत असल्याने ती अतिशय पवित्र मानली जाऊन तिचे युद्धे होऊ लागली. आर्यांची शेतीची सुरुवातीची अवजारे दगडी व ओबडधोबड होती. परंतु लोखंडाचा उत्पादनात वाढ झाली. गहू, तांदूळ, तीळ, जव, कापूस ही मुख्य पिके होती. साधारणतः शोध लागताच त्यापासून शेतीची अवजारे बनविण्यात येऊ लागली त्यामुळे शेती वर्षातून दोनदा पिके घेतली जात नांगराने शेती केली जाई व नदीचे पाट काढून शेतीला पाणीपुरवठा केला जाई

**उद्योगधंदे –**

शेतीतून कापूस व शेळ्यामेंढ्यांपासून लोकर व कातडी मिळे.यावर आधारित उद्योगधंदे निर्माण झाले. सुती व गरम कापड तयार करणे, त्यांना रंगवून त्यांच्यावर वगवेगळ्या प्रकारची वेलबुट्टी काढणे, शेतीसाठी लाकडी व लोखंडी अवजारे तयार करणे, सोने, चांदी या धातूंचे अलंकार तयार करणे, मातीची भांडी बनविणे इ. व्यवसाय होते. समाजात सोनार, कुंभार, चांभार, सुतार, लोहार, विणकर, रंगारी इ. व्यवसायाचे लोक राहत

**व्यापार**

व्यापार हा खुष्की व जलमार्गाने होत असे. जमिनीवरून बैलगाड आणि रथ व समुद्र व नद्यातून नौकाद्वारे व्यापार होत असे. रस्ते असुरक्षित होते व्यापारात यश मिळावे व चोर-लुटारूपासून त्रास होऊ नये म्हणून ऋग्वेदात काही प्रार्थना आहेत. त्या काळी व्यापार हा 'पणि' लोकांच्या हाती होता. ते अत्यंत कस व वैदिक देवतांना न मानणारे होते. त्यावरून ते अनार्य असावेत. ऋग्वेदकाळात मुद्राशोध लागला नव्हता. वस्तुविनियम पद्धती होती. गायींचा उपयोग विनिमयासाठी होत असे ऋग्वेदात 'निष्क'चा उल्लेख येतो हे सुवर्ण नाणे होते किंवा नाही याविषयी निश्चित विधान करता येत नाही.

या काळात व्यवसायात वंशपरंपरा निर्माण होण्यास सुरुवात होऊन एकाच वंशात एकच व्यवसाय पिढ्यानपिढ्या सुरू राहिल्याने व्यावसायिक कौशल्यात वाढ होऊ लागली परंतु यात अजून कर्मठपणा आला नव्हता. इच्छेनुसार व्यवसाय निवडता येत असे श्रमविभागणी ही गुणकर्मावर आधारित असून त्याला वर्ण किंवा जातीभेदाचा अजून स्पर्श झाला नव्हता.

**४) धार्मिक जीवन**

आर्यांचा धर्म व धर्माविषयक कल्पना या एकेकाळी किवा एका ठिकाणी निर्माण झाल्या नाहीत. त्यांच्या जीवनाच्या सर्वांगीण विकासाबरोबर या कल्पनाही विकसित होत गेल्या. लाभकारक शक्तीबद्दल आदर व कृतज्ञता आणि अपायकारक शक्तींबद्दल भीती ही मानवाची निसर्गसुलभ भावना आहे. याच भावनेतून आर्यांच्या धर्म व धर्मविषयक कल्पनांनी आकार धारण केला.आर्यांच्या जीवन विकासात नद्या, पर्वत, पाऊस, अग्नी, वरुण, वारा इ. निसर्गशक्ती साहाय्यभूत ठरल्या.

**सृष्टीचे त्रिविध स्वरूप –**

आर्यांनी सृष्टीचे रूप त्रिविध मानले आहे. पृथ्वी अंतराळ व आकाश प्रत्येक भागात त्यांनी अकरा देवता कल्पिल्या. तिन्ही लोक मिळून तेहतीस कोटी देवता कल्पिण्यात आल्या. येथे कोटी हा शब्द संख्यावाच नसून प्रकार वाचक आहे तेहतीस कोटी म्हणजे तेहतीस प्रकारच्या देवता पृथ्वी सोम, अग्नी या पृथ्वीवरील, इंद्र, यम, वायू, पर्जन्य या अंतराळातील आणि विष्णु सूर्य, मित्र, वरुण इ. आकाशातील देवता मानण्यात आल्या. सुरुवातीला अग्नी ही सर्वात महत्त्वाची देवता होती कारण ती अग्निरूपाने पृथ्वीवर, विजेच्या रूपाने अंतराळात आणि सूर्याच्या रूपाने आकाशात वास करणारी म्हणजे सर्वव्यापी आहे अशी समजूत होती. कालांतराने इंद्रदेवतेला महत्त्व प्राप्त झाले. ही लढाऊ देवता असून या देवतेला उद्देशून ऋग्वेदात अनेक मंत्र आहेत.ऋग्वेदात इंद्राची स्तुती करणाऱ्या २५० ऋचा आहेत. ही संख्या ऋग्वेदातील एकूण स्तुतीपर मंत्रांच्या सुमारे एक चतुर्थांश आहे. यावरून ऋग्वेदकाळात इंद्रदेवतेला किती महत्त्व होते ते स्पष्ट होते. इंद्र हा देवाधिदेव होता. आकाशात राहणारा वृत्रासुर नावाचा राक्षस पावसाच्या मेघांची चोरी करतो. त्या वृत्रासुरावर आपल्या वज्राने प्रहार करून इंद्र त्याला पळवून लावतो आणि आपली उपासना करणाऱ्या उपासकांच्या भूप्रदेशात वर्षाधारांची वृष्टी करतो, अशी इंद्र या देवतेविषयी आर्यांची श्रद्धा होती. आर्य हे कृषक असल्याने त्यांच्या दृष्टीने इंद्र ही अत्यंत साहाय्यक देवता होती. ही देवता सर्वव्यापी असून सृष्टीच्या प्रत्येक हालचालीवर तिचे नियंत्रण असते. ती नीतीची निर्माती देवता आहे अशी आर्यांची कल्पना होती. आर्यांच्या इतर देवतांमध्ये सोम ही वीररस निर्माण करणारी तर अग्नी ही आरोग्य व जीवन देणारी देवता मानली जाई.

आर्यांच्या धर्मविषयक कल्पना या अत्यंत साध्या व सोप्या होत्या भौतिकवाद हा त्यांचा आधार होता. सुरुवातीला या धर्मात मूर्तिपूजा नव्हती. निसर्गदेवतांची उपासना होत असे. सुरुवातीला आर्य अनेक देवता मानीत परंतु हळूहळू ते एकेश्वरवादी बनले. कालांतराने आर्यांची जी धार्मिक सांस्कृतिक परंपरा निर्माण झाली. तिचा पाया ऋग्वेदकाळातच घातला गेला.

**यज्ञसंस्था व तिचा उद्देश**

देवतांची निर्मिती मानवाच्या कल्पनेतून झाली असल्याने देवतांचे मानवीकरण होणे अपरिहार्य होते. त्यामुळेच मानवी गुणदोषांचे, त्याच्या आवडीनिवडींचे प्रतिबिंब देवतांमध्ये उमटलेले दिसते. मानवाप्रमाणे देवालाही मानवी अवयव चिकटविण्यात आले. माणसाला स्तुती आवडते. त्याला भेटवस्तू दिल्या की तो खुश होतो देवतांनाही अशा भेटवस्तू दिल्या की त्या प्रसन्न होऊन इच्छित फल देतील

परंतु सर्व महत्त्वाच्या देवता अंतराळ किंवा आकाशात राहतात. त्यांच्यापर्यंत भेटवस्तू कशा पोहोचत्या करायच्या हा आर्यापुढे प्रश्न होता. अग्नी या देवतेच्या रूपाने आर्यांना या प्रश्नाचे उत्तर सापडले. ही देवता पृथ्वी, अंतराळ आणि आकाश या तिन्ही लोकात वास करते. ती सर्वसाक्षी असून धुराच्या रूपाने वर जाते. यातूनच यज्ञाच्या माध्यमातून देवतांना हविर्भाग देण्याची कल्पना आर्यांना सुचली. अग्नी हा मानवाची प्रार्थना व हविर्भाग देवतांपर्यंत पोहोचविणारा दूत बनला. यज्ञ हे भौतिक सुखासाठी केले जात. संपत्ती, संतती, दीर्घरोग्य, शत्रूवर विजय मिळविणे, भरपूर शेती पिकणे थोडक्यात सुखी व समृद्ध जीवनासाठी यज्ञ केले जात ऋग्वेदकाळी दोन प्रकारचे यज्ञ केले जात.
१) यजमानाने घरी नियमित करावयाचा यज्ञ आणि २) विशेष प्रसंगी करावयाचा यज्ञ

**१) खाजगी व घरच्या घरी नियमित करावयाचे यज्ञ यज्ञाचे प्रकार होते.**

अ) ब्रह्मयज्ञ - यात स्वाध्याय व अध्यापनावर भर देण्यात येई.

ब) देवयज्ञ अग्निकुडात आहुती देऊन देवतांना प्रसन्न केले जाई.

क) आवश्यक त्या वस्तु बना देगे बात स्वस्थ पितरांपर्यंत पोहोचतात अशी श्रद्धा होती. वालाच श्राद्ध म्हणतात.

ड) भूत-निराळ्या देवतांना प्रसन्न करण्यासाठी बळी चढविशे

इ) मनुष्य यज्ञ - ब्राह्मणांना दान देऊन अतिथींचा यथाशक्ती सत्कार करणे

**२) विशेषप्रसंगी करावयाचे यज्ञ**

भौतिक आणि आधिभौतिक लाभासाठी हा यज्ञ केला जात असे. जसे दीर्घायुष्यासाठी 'आयुष्यकामष्टी', पुत्रप्राप्तीसाठी 'पुत्रकामेष्टी' चक्रवर्ती राजा होण्यासाठी राजसूय यज्ञ इ. हे यज्ञ यजमानाला अनेक पुरोहितांच्या मदतीने करावे लागत. या यज्ञाचा विधी अत्यंत क्लिष्ट व खर्चिक असे. सामान्य माणसांना ते परवडनात परिमाणी घरच्या घरी करावयाचे यज्ञ बंद झाले व यज्ञ ही श्रीमंतवर्ग व राजेमहाराजे यांचीच मक्तेदारी होऊन बसली. हे यह सार्वजनिकरीत्य होत काही काळानंतर व्यवसाय व वर्ण निर्माण झाल्यावर पुरोहितवर्गाचे वर्चस्व वाढले. करणे यजमानाला इच्छित फलप्राप्ती कावी म्हणून मंत्र म्हणणे इ. कामे पुरोहितांचे असल्याने त्यांच्याशिवाय यह अशक्य झाले. यज्ञविधीही दिवसेंदिवस बिकट ह जाऊन यज्ञाचा मूळ उद्देश मागे पडला यज्ञात साध्यापेक्षा साधनांना (विधी, यज्ञसामुग्री इ.) महत्त्व प्राप्त झाले. यज्ञातील आहुतीचे प्रमाण वाढले. धनधान्य, तेल, तूप याबरोबर पशुबळी व कधीकधी नरबळीही दिला जाऊ लागला. यज्ञसंस्थेत अंधश्रद्धा व कर्मठपणा शिरून व ही विशिष्ट वर्तनी मिरासदारी होऊन बसली.

**मरणोत्तर जीवन** –

शरीर नश्वर, नाशवंत असून त्यात वास करणारा आत्मा मात्र अमर आहे मनुष्याच्या मृत्यूनंतर त्याचे शरीर नाश पावते. ते मातीत मिसळ आत्मा मात्र अमर असल्याने तो प्रथम यमलोकी जातो. यम लोकातून पुण्यवान आत्म्यांची स्वाननी पितृलोकात (स्वर्ग, देवलोक) होते त्या ठिकाणी पितर आल्याच्या रूपने वास करतात. पितृलोकात पुण्यवान आत्म्यांसाठी सर्व सुखे हात जोडून उभी असतात. हे आत्मे पितृलोकात राहून पृथ्वीवरील स्वतःच्या संततीची काळजी घेतात. दुष्ट व पापी आत्मे मातीत म्हणजे नरकात जातात त्या ठिकाणी त्यांना नरकयातना भोगाव्या गात मरणेतर जीवनच अशा प्रकारची कल्पना होती. पुनर्जन्म कल्पव अजून जन्म झाला नव्हता. ऐहिक जीवन जास्तीत जास्त सुखी व सुंदर कसे करता येईल व जास्त चांगल्या रीतीने कसा उपभोग घेता येईल असाच त्यांचा जीवनाविषयक दृष्टि होता. जीवन हे उपभोगण्यासाठी आहे. त्यातील सौंदर्य लुटण्यासाठी ही आर्यांची विचार होती. म्हणूनच त्यांच्या धार्मिक वाङ्मयात स्वर्गाचा स्पष्ट परंतु नरकाचा अस्पष्ट आहे. मद्यपान, जुगार, व्यभिचार, चोरी यांची गणना पापाचरणात करण्यात आली.पवित्र आत्मे स्वर्गसुख उपभोगत, स्वतः च्या पृथ्वीवरील संततीची काळजी घेतात अश आर्यांची समजून होती. पुनर्जन्माविषयी त्यांच्या कल्पना अस्पष्ट होत्या. थोडक्यात आ प्रारंभिक म्हणजे ऋग्वेदकालीन तत्त्वज्ञान हे जीवनवादी होते. त्यात नैराश्य किवा नकारात्म दृष्टिकोनाचा लवलेशही नव्हता.

# उत्तर वैदिक काळ

## उत्तर वैदिक काळ म्हणजे काय ?

सर्वप्रथम ऋग्वेदाची रचना झाली. विद्वानांच्या मते इ.स.पू. २५०० च्या सुमारा ऋग्वेदाच्या रचनेला सुरुवात होऊन इ.स.पू. १२०० च्या आसपास ही रचना पूर्ण झाली असावी म्हणूनच या कालखंडाला पूर्व वैदिक काळ किंवा ऋग्वेदकाळ म्हणतात. या कालखंडानंतर यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद हे तीन वेद व त्यानंतर ब्राह्मणे, आरण्यके उपनिषदे, वेदांगे, पुराणे, महाकाव्ये इ. वैदिक साहित्य निर्माण झाले. ऋग्वेदाच्या निर्मितीनंतरच्या कालखंडाला उत्तरवैदिक काळ म्हणतात. ऋग्वेदानंतरचे वैदिक साहित्य हे इ.स.पू. १२०० ते इ.स.पू. २००

या कालखंडात निर्माण झाल्यामुळे या कालखंडाला उत्तर वैदिक काळ म्हणतात. पूर्व वैदिक काळ ऋग्वेद काळ आणि उत्तर वैदिक काळ यात बरेच अंतर आहे. पूर्व वैदिक काळातील संस्कृतीत त्याच काळात परिवर्तन घडून येत होते. आर्य उत्तर भारताच्या बऱ्याच मोठ्या प्रदेशात पसरले होते. त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनात झपाट्याने बदल होत गेले. या काळात ब्राह्मणांचे वर्चस्व अतोनात वाढल्याने या काळाला ब्राह्मणयुगही म्हणतात.

**आर्यांचा विस्तार**

ऋग्वेदकाळात आर्य अफगाणिस्थान ते गंगा नदीचा उत्तर भाग या भागात पसरले. आर्यांच्या वायव्येकडून सतत येणाऱ्या टोळ्या, जागा व अन्नधान्याची कमतरता, अनार्यांशी होणारी युद्धे, आर्य संस्कृतीचा प्रचार व प्रसार या व अशा अनेक कारणांमुळे आर्य दक्षिण-पूर्व दिशेने सरकले. कुरुक्षेत्र, राजस्थानचा पूर्व भाग, गंगा-यमुनेचे खोरे या भागात आर्य शिरले. हा त्यांचा प्रवास अतिशय संथगतीने सुरु होता पावलोपावली त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. या भागाला त्यांनी 'ब्रह्मर्षी' हे नाव दिले. येथून ते अधिक खाली म्हणजे विंध्य-सातपुडा पर्वतापर्यंत सरकले. या भागाला ते मध्यदेश म्हणू लागले. अशा रीतीने उत्तर वैदिक काव्यत आर्य वायव्येला अफगाणिस्थान, उत्तरेला पंजाब, हिमाचल परिसर, पूर्वला बंगाल-बिहार, पश्चिमेला राजस्थान आणि दक्षिणेला विंध्यपर्वतापर्यंत पसरले. जवळजवळ संपूर्ण उत्तर भारत आयांच्या ताब्यात आला. येथे आर्य संस्कृती पसरली. या प्रदेशाला 'आर्यावर्त असेही म्हणण्यात येऊ लागले. विंध्य पर्वताच्या पायथ्याशी पोहोचल्यावर आर्यांची गती काही काळ मंदावली पण लवकरच विंध्यप्रदेश ओलांडून दक्षिण भारतात प्रवेश केला. या प्रदेशाला त्यांनी 'दक्षिणापथ' असे नाव दिले.

**अ) राजकीय जीवन**

या काळात ऋग्वेदकाळातील लहान लहान गणराज्ये नष्ट होऊन त्यांच्या जागी मोठी व साम्राज्यवृत्तीची राज्ये निर्माण झाली. या काळात आयचि मुख्य कार्यक्षेत्र हे सप्तसिंधू प्रदेशातून कुरुक्षेत्र व मध्यदेशात सरकले. या काळात आयचि जे साहित्य निर्माण झाले त्यात कुरुक्षेत्र, कोसल (अयोध्याप्रांत), काशी, विदेह (उत्तर बिहार), अंग (पूर्व बिहार) या प्रदेशांचा वारंवार उल्लेख येतो. ही त्या काळातील महत्त्वाची राज्ये होती.

१) गांधार - आज पाकिस्तानात असलेल्या रावळपिंडी आणि पेशावरच्या मधोमध सिंधू नदीच्या दोन्ही अंगांना हे राज्य पसरले होते. तक्षशिला आणि पुष्करावती (पेशावर) ही या राज्याची दोन महत्त्वाची शहरे होती.

२) कैकेय हे राज्य गांधारची सीमा ते व्यास (बियास) नदी दरम्यानपसरले होते.

३) मद्र - हे पाकिस्तानातील सियालकोटपासून ते पंजाबातील रावी नदीपर्यंत पसरले होते.

४) कुशीनगर - हे राज्य हरिद्वारच्या मागच्या बाजूस पसरले होते.

५) मत्स्य - हे विशाल राज्य असून राजस्थानातील अलवार, जयपूर आणि भरतपूर या भागात पसरले होते. येथे महाभारतातील प्रसिद्ध राजा विराट होऊन गेला.

६) कुरू - मध्यदेशातील हे महत्त्वाचे राज्य. याला कुरुक्षेत्रही म्हणत. हे राज्य दिल्लीच्या आसपास पसरले होते. कुरुंची टोळी ही भरत, पुरू आणि इतर नव्हते. कुरूंचे राज्य सरस्वती व गंगा नदीच्या दरम्यान पसरले असून 'आसन्दीवत' काही टोळयांची मिळून बनली होती. या काळात भरत टोळीचे नावही शिल्लक उरले (हस्तीनापूर) याची राजधानी होती. कुरुश्रवण हा येथील पहिला राजा. कुरूंचा पहिला महत्त्वाचा राजा म्हणजे अर्जुनाचा नातू व अभिमन्युचा पुत्र 'परिक्षित' याचा नागराज काने वध केल्याने परिक्षितचा मुलगा जनमेजय याने वडिलांच्या वधाचा सूड घेण्यासाठी रागाच्या तक्षशिला राजधानीवर हल्ला करून नागांचा भयंकर संहार केला. महाभारतात हे घटना 'सर्पयज्ञ' या नावाने प्रसिद्ध आहे. या घटनेनंतर जनमेजयाने अक्षमेध यज्ञ बेला जनमेजयानंतर शतानिक हा राजा झाला. पुढे निचक्षु या राजाने हस्तीनापूर ही राजधानी वाहून गेल्याने अलाहाबादपासून साठ मैलांवर पश्चिमेला कोसाम्बी नवी राजधानी वसवली. कुरूंचे राज्य अत्यंत समृद्ध होते.

७) पांचाल - कुरूंच्या पूर्वला व आधुनिक उत्तर प्रदेशातील बरेली, बदा आणि फरूकाबाद या भागात पांचालचे राज्य होते. वैदिकपूर्व काळातील क्रिवी पांचाल अनु, द्रह्यू, तुर्वसू या टोळयाही पांचालात सामील झाल्या असाव्या य सत्रासह आणि दुर्मुख हे पाचालांचे महत्त्वाचे राजे कुरू व पांचाल हा इतर आद राज्यांच्या दृष्टीने आदर्श राज्ये होती. ऋग्वेदकाळात भरत आणि पुरू टोळयांना जे स्थान होते तेच उत्तरवैदिक काळात कुरू व पांचाल राज्यांना होते. सुरुवातीला वा दोन्ही राज्यांचे संबंध मैत्रीपूर्ण होते परंतु महाभारत काळात ते पार बिघडले. कापिल्य, परिचक्र ही या राज्यातील महत्त्वाची शहरे उत्तर वैदिक काळात कुरू व पांचार ही राज्ये आर्यसंस्कृतीचे प्रतिनिधी, विद्वानांचे आश्रयदाते, यज्ञ करणारे व शुद्ध संस्कृत बोलणारे म्हणून प्रसिद्ध होते. म्हणजेच

८) कोसल - पांचालांच्या पूर्वेला सरस्वती व गंडकी नद्यांच्या परिसरात कोसलांचे राज्य होते. अयोध्या त्यांची राजधानी होती. कोसल हे मूळचे आर्य नसावेत परंतु त्यांच्यावर आर्यसंस्कृतीचा फार प्रभाव होता.

९) काशी - कोसल राज्याच्या पूर्वेला काशीचे राज्य होते. तेथील सुप्रसिद्ध राजा अजातशत्रू हा विदेह राजा जनकाचा समकालीन होता.

१०) विदेह - हे राज्य बिहारमध्ये होते. तेथील राजा जनकराजा प्रकांड पंडित होता. कोसल, काशी आणि विदेह या तीन राज्यांचा बराच काळ एकसंध असावा.

११) मगध व अंग - मगध व अंग हे बिहारच्या पूर्वेकडील प्रदेश आर्यसंस्कृतीच्या प्रभावाबाहेरील प्रदेश असावेत अथर्ववेदात त्यांचा 'वात्य' (जातीबाह्य) म्हणून उल्लेख आहे. ते अनार्य असावेत. परंतु आर्यांनी त्यांना आपल्यात सामावून घेतले असावे.

या काळात संपूर्ण उत्तर भारतात आर्यांची विशाल राज्ये निर्माण झाली. उत्तर भारतात पूर्वेकडे अंग व मगधसारखी काही अनार्य राज्ये होती परंतु ती जास्त काळ आर्यसंस्कृतीच्या प्रभावापासून मुक्त राहू शकली नाहीत आणि लवकरच संपूर्ण उत्तर भारत आर्यसंस्कृतीमय झाला.

**राजसत्ता –**

ऋग्वेदकाळापेक्षा या काळातील राज्ये जास्त विशाल व वैभवशाली होती. या काळात साम्राज्य, सम्राट या कल्पनांचा उदय झालेला दिसतो. ऋग्वेदकालीन - गणराज्यांची कल्पना मागे पडू लागली. गणराज्यांतर्गत युद्ध होऊन जो जास्त पराक्रम गाजवील, विजय मिळविल त्याला लोक आपला राज मानू लागले. राजा हा अधिराज, राजाधिराज, एकराट, विराट, सम्राट या नावांनी संबोधिला जाऊ लागला. इतर राज्यावर विजय मिळवून विशाल साम्राज्य निर्माण करणे व अश्वमेध, राजसूय यज्ञ करून सम्राट सार्वभौम इ. उपाधी प्राप्त करणे हे या काळातील राजांचे उद्दिष्ट बनले. या काळात पराक्रम गाजवून विशाल साम्राज्य निर्माण केल्याने वेळी तंत्राची कल्पना मागे पडून राजसत्ताक' पद्धती होऊ लागली. राजपद वंशपरंपरेने एकाच राण्याकडे ठेवण्याची कल्पना मान्यता पावली. परंतु अजूनही काही गणराज्ये अशी ही की ज्यात लोकप्रतिनिधी राजाची निवड करीत. राजपदावर विराजमान होण्यापूर्वी राज्याभिषेक करण्याची प्रथा या काळात सुरू या विधीला राजकीय व धार्मिक महत्त्व होते. पुरोहित हा विधी करीत असे. राजाला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यात येई राजा 'मनसा, वाचा काया प्रजेच्या सर्वतोपरी हितरक्षणाची प्रतिज्ञा करीत असे. लोककल्याण हे राजाचे मुख्य कर्तव्य समजले जाई व राजाही या कर्तव्याचे पालन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करी काव्यतराजांना राजपदावर राहण्याचा नैतिक अधिकार नसे.

**राजसत्तेच्या मर्यादा –**

या काळात राजेलोकांनी पराक्रम गाजवून अमर्याद संपती गोळा केली होती. त्याच्या या पराक्रमामुळे त्याच्यात दैवी अंश आहे ही कल्पना दृढ होऊ लागली होती. "राजाच्या दैवी अधिकाराच्या सिद्धांताला" या काळात हळूहळू लाभत होती. त्याला प्रत्यक्ष प्रतिपरमेश्वर मानण्यापर्यंत लोकांची मजल गेली. परंतु असे असले तरी राजसत्ता निरंकुश नव्हती. जुलमी, पापाचरणी, प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करणाऱ्या राजाची तत्कालीन वाङ्मयात निंदा करण्यात आली आहे. राजावर धनांनुसार राज्यकारभार करण्याचे बंधन असे धर्मसत्ता ही राज्यसत्तेवर अंकुश ठेवीत असे व धर्मानुसार राज्यकारभार करण्यात राजांना कोणताही कमीपणा वाटत नसे. राजाला मदत करणारे अधिकारी अग्वेदकाळातील लहान गणराज्ये मागे - पडून या काळात विशाल साम्राज्ये निर्माण झाल्याने राजाला राज्यकारभारात मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या संख्येत जशी वाढ झाली तशी काही नवीन अधिकारपदेही निर्माण झाली.

राजाला राज्यकारभारात सल्ला देण्यासाठी जे अधिकारी असत त्यांना 'रलिन' (मंत्री) म्हणत रत्लिनमध्ये सेनापतीला सर्वांत जास्त महत्त्व असे. तो सैन्यभरती, युद्धसमयी सैन्यसंचालन व शांततेच्या काळात अंतर्गत सुव्यवस्था राखण्याचे काम करी. सेनापतीच्या लोखाल पुरोहिताचा दर्जा असे. पुरोहित राजाच्या यशसिद्धीसाठी यज्ञ करीत असे. तो राजाला धर्मानुसार राज्यकारभार करण्याचा सल्ला देत असे. याशिवाय संग्रहित (खजीनदार), भागदूक (करवसुली करणारा) सूत (राज्यातील बातम्या गोळा करणारा भट, सारथी), अक्षावाप (द्युतप्रबंधक व राज्याच्या जमाखर्चाचा हिशेब ठेवणारा), गोविकर्तन (वनअधिकारी), पालागल (संदेशवाहक) इ. अधिकारी असत. या मंत्र्यांचे राज्यकारभारावर नियंत्रण राहत असे. राजघराण्यातील सरदार मंडळींना राजन्य म्हणत. ते राजाला युद्धात मदत करीत जनहित, संरक्षण व प्रजेची उन्नती या राजपदाच्या प्रमुख जबाबदाऱ्या या जबाबदाऱ्या पार पाडणारा राज्यसिहासनावर टिकून राहू शकत असे.खेडयात ग्रामणी हा प्रमुख अधिकारी असे ऋग्वेदकाळापेक्षा या काळात ग्रामी अधिकारात बरीच वाढ झाली असून या काळात त्याच्याकडे खेड्यातील मुलका, आणि न्यायदानाचे अधिकार आले होते. सभा व समिती राजाला राज्यकारभारात सल्ला देण्यासाठी

**सभा व समीति**

या दोन राजकीय संस्था होत्या. अथर्ववेदानुसार राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी व या दोन समित्यात सुसंवाद असणे आवश्यक होते सभा ही निवडक लोकाची मिळून बनलेली असे तर समितीत समाजातील सर्वच स्तरातील ल सभेच्या बहुमताच राजावर बंधन असे सभा पुष्कळदा न्यायदानाचेही काम करा वृत्तीला लागल्याने आणि राजाच्या देवी अधिकारान लोकप्रिय होऊ लागल्याने राजावरील बंधने हळूहळू शिथिल होऊ लागली. परिणा सभा व समितीचेही महत्त्व कमी होऊन त्या केवळ राजाला राज्यकारभारविषयक सल्ल देणाऱ्या संस्था झाल्या. राजा जर शक्तिशाली असेल तर तो सभा व समितीला गुडा ठेवून राज्यकारभार करू लागला.

**राज्याच्या उत्पन्नाची साधने**

राज्याचा जसजसा व्याप वाढू लागला तसत राज्याचा खर्चही वाढला व त्यासाठी नवीन करांची आवश्यकता भासू लागली. राज्यात प्रजेकडून नियमित कर मिळत असे त्याला 'बळी' म्हणत. तो धान्य किंवा पशुच्य स्वरूपात दिला जाई. साधारणपणे स्वतःच्या उत्पन्नाचा १६ वा भाग प्रजा राजान कराच्या रूपात देत असे. ब्राह्मण व क्षत्रिय करांपासून मुक्त होते वैश्यांवर कराव जास्तीत जास्त भार असे पराभूत शत्रूराजाकडून मिळालेली खंडणी आणि लूट हेही उत्पन्नाचे साधन होते. शिवाय प्रसंगानुरूप प्रजा राजाला नजराण्याच्या रूप भेटवस्तू देत असे करवसुली भागटुक नावाचा अधिकारी करीत असे.

**कायदा** –

उत्तरवैदिक काळातही आजच्यासारखे चोरी, दरोडे, बलात्कार, खून, फसवाफसवी असे गुन्हे होत असत अपराध्यांना हात-पाय तोडणे, कान कापणे, हसणे इ कठोर शिक्षा दिल्या जात प्रसंगी मृत्युदंडही दिला जाई कायदा धर्म व परंपरेवर आधारला होता. या काळात आर्यांना स्थैर्य प्राप्त झाल्याने व शेती हा मुख्य व्यवसाय असल्या मालमतेची वारी, वारसा हक्क इ. प्रश्न निर्माण झाले. मालमत्तेचे अधिकार कुटुंबप्रमुखा असत स्त्रियांना कौटुंबिक मालमत्तेवरील अधिकार नाकारण्यात आला होता.

**न्याय**

न्यायदान करणे हे राजाचे महत्त्वाचे कर्तव्य होते. याबाबत राजाल मदत करण्यासाठी सभापती नावाचा अधिकारी असे खेड्यातील किरकोळ स्वरूपान खटले ग्रामवादिनी या अधिकाऱ्याना चालविले जात. या काळात दिवाणी व कायद्याची संहिता होती किया नहीं याविषयी निश्चित मत व्यक्त करणे कठीण आहे दिवाणी स्वरूपाचे खटले चालविले जात.या काळात वर्णव्यवस्थत दृढता येऊ लागल्याने न्यायदानात पक्षपात होत असे. हत्या हा घोर अपराध मानला जाई. राजद्रोह्यांना देहदंड दिला जाई. निरपराधित्व सिद्ध करण्यासाठी पुष्कळदा 'दिव्य' करावे लागे जसे अग्निपरीक्षा.

**सामाजिक जीवन**

ऋग्वेदानंतरचे इतर वैदिक साहित्य उत्तर वैदिक काळात रचले गेले. या साहित्यातून तत्कालीन आर्यांच्या समाजजीवनावर चांगला प्रकाश पडतो.

**नगरांच्या संख्येत वाढ**

आर्य संस्कृती ही ग्रामीण संस्कृती होती. विशेषतः वेदकाळात आर्य खेड्यांमधून राहत परंतु उत्तरवैदिक काळात ही परिस्थिती बदलली.. वाढती लोकसंख्या, त्या वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याच्या गरजा भागविण्यासाठी व वस्ती करण्यासाठी जंगले तोडून साफ केलेली जमीन, ताब्यात आलेले नवे भूप्रदेश, गत साधनांचा शोध इ. अनेक कारणांमुळे अनेक लहान ग्रामांचे रूपांतर नगरात झाले. काही नगरे नव्यानेही उदयाला आली. ही नगरे आर्याच्या राजकीय सामाजिक आणि धार्मिक चळवळीची केंद्रे बनली.

**ग्रामीण जीवन-**

नगरांची संख्या झपाट्याने वाढत असली तरी आर्यसंस्कृती हो कृषिप्रधान संस्कृती असल्याने बहुसंख्य लोक खेड्यापाड्यातच राहत. एका ग्रामात अनेक कुटुंबे राहत. एका कुटुंबात सामान्यतः तीन पिढ्यांचे लोक एकत्र राहत. खेड्यातील घरे दगड, विटा, बांबू, लाकूड व मातीची बनविली जात. घरात स्वयंपाकगृह, शयनगृह, स्त्रियांसाठी स्वतंत्र खोल्या, अतिथीकक्ष, अग्निशाळा, स्नानगृह शिवाय पशुसाठी स्वतंत्र व्यवस्था असे.कौटुंबिक वातावरण अत्यंत स्नेहमयी असे. कुटुंबप्रमुखाचा अधिकार सर्व कुटुंबावर चालत असे. कुटुंबाचे रक्षण, पालन-पोषण, मालमत्तेची वाटणी, धार्मिक कार्य इ. कुटुंबप्रमुखाची जबाबदारी असे. थोडक्यात ही आदर्श व्यवस्था होती.

**वर्णव्यवस्था** - समाजाचा कारभार सुरळीत रीतीने चालावा म्हणून आर्यांनी वर्णव्यवस्था निर्माण केली. ऋग्वेदकाळात ही व्यवस्था रुजली आणि उत्तर वैदिक काळात ती दृढमूल झाली. सुरुवातीला ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे तीन वर्ण व कालांतराने शूद्र चतुर्थ वर्ण निर्माण झाला. या प्रत्येक वर्णाची कर्तव्ये निश्चित करण्यात आली. वर्णव्यवस्थेची आधारभूत तत्त्वे पुढीलप्रमाणे होती.

**रंग-** वर्ण म्हणजे रंग, भारतात आलेले आर्य हे गौरकाय होते. त्यांचा अनार्यांशी संबंध आल्यानंतर त्वचेच्या रंगावरून आर्य व अनार्य असे दोन स्पष्ट भेद निर्माण अले आर्य-अनार्य संघर्षात आर्य विजयी झाल्याने आर्यांची प्रत्येक गोष्ट अनार्यांपेक्षा परंतु ते यशस्वी ठरल्याने गौरवर्णाला प्रतिष्ठा लाभली हे निर्विवाद सत्य आहे ती प्रतिष्ठा आजतागायत कायम आहे. दक्षिण अफ्रिकेत केवळ वर्णाच्या आधारावर मूठभर ठरली. आर्य गोरे होते म्हणून यशस्वी ठरले असे म्हणणे हास्यास्पद आहे.

**स्त्रीचे स्थान**

ऋग्वेदकाळापेक्षा या काळातील स्त्रीच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने आलेली दिसतात. तिचा सामाजिक दर्जाही घसरलेला दिसतो. ती दिवसेंदिवस परावलंबी बनून चूल आणि मूल याच आवर्तात गुरफटताना दिसते. स्त्री जन्म हा संकटांना आमंत्रण देणारा तर पुरुषजन्म वंशाचे रक्षण करण ही कल्पना या काळात प्रसूत होताना दिसते. त्यामुळे ऋग्वेदकाळातील स्त्री-पुरुष सम भावना हळूहळू लोप पावून तिचा सामाजिक क्षेत्रातील सहभाग कमी होऊ लागला. धार्मिक कार्यात जरी ती पतीच्या बरोबरीने भाग घेत असली तरी पूर्वी स्त्री म्हणत असलेले मंत्र आता पुरोहित म्हणू लागले. पूर्वी स्त्रीवर संस्कार होत असताना वैदिक मंत्राचे पठण होई तो प्रकार आता बंद झाला. बहुपत्नित्वाची प्रथा असल्याने मुख्य पत्नीला सामाजिक व धार्मिक सन्मान व अधिकार मिळत. इतर स्त्रिया मात्र यापासून वंचित राहत. सवतीमधील भांडणामुळे कौटुंबिक वातावरणातही कटुता निर्माण होई. स्त्रीच्या शिक्षणाबाबत मात्र समाज अजूनही जागरूक होता. आदर्श गृहिणी होण्यासाठी आवश्यक ते सर्व शिक्षण उदा. पाककला, गृहसजावट, संगीत, नृत्य थोडक्यात खीचा शारीरिक, बौद्धिक आणि सांस्कृतिक विकास घडवून आणणारे शिक्षण तिला दिले जाई. गार्गी, मैत्रेयी यासारख्या विदुषी राजदरबारातील विद्वानांच्या सभेत उत्तख्य गहन विषयावर पुरुषांच्या बरोबरीने चर्चा करीत. काही स्त्रियांनी रणांगण गाजविल्याचेही उल्लेख आहेत. असे जरी असले तरी सर्वसामान्य स्त्रीची अवस्था दिवसेंदिवस वाईट होत चालली होती. द्रौपदीसारख्या राजघराण्यातील व पराक्रमी पतींच्या स्त्रीला दरबारात नग्न करण्याचा प्रयत्न जेथे होतो तेथे सर्वसामान्य स्त्रियांची अवस्था किती वाईट असेल याची आपण कल्पना करू शकतो. विधवाविवाह होत असत. सतीची चाल सुरू झाली असावी. पंडू राजाबरोबर त्याची पत्नी माद्री सती गेल्याचा उल्लेख मिळतो उत्तर वैदिककाळात श्री ही पूर्णपणे पुरुषावर अवलंबून राहताना दिसते. ती पुरुषाची सावली समजली जाऊ लागली. तिचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट होऊन ती स्वतःला पतिव्रता, पुरुषाची अर्धांगी म्हणवून घेण्यात धन्य समजू लागली. येथूनच स्त्रीच्या गुलामगिरीला झपाट्याने सुरुवात झाली. आज देशात स्त्रीमुक्ती आंदोलनासारखी आंदोलने खीला या हजारो वर्षांच्या गुलामगिरीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. ज्या दिवशी तो योग येईल तो सुदिन.

**सोळा संस्कार**

संस्कार हा शब्द संस्करण या शब्दापासून तयार झाला. संस्करण म्हणजे शुद्ध करणे. शरीर आणि मन शुद्ध करण्यासाठी गर्भ मातेच्या उदरात असतानापासून ते मृत्यूपर्यंत वेगवेगळे संस्कार केले जातात. या संस्कारात विशिष्ट पद्धतीची पूजा करणे. मंत्र म्हणणे, विधी करणे याला महत्त्व होते. पुढे कर्मकांडाबरोबर संस्काराच्या संख्येतही बाढ झाली. हे संस्कार सोळा असून पुढीलप्रमाणे आहेत.

**१) गर्भाधान** -

चांगली संतती जन्माला यावी म्हणून मात-पित्यांवर हा संस्कार केला जात असे. मुलगी ऋतुमती झाल्यानंतर तीन वर्षांनी हा संस्कार केला जाई.

**२) पुंसवन** –

या काळात पुत्र जन्माचे महत्त्व वाढू लागल्याने हा संस्कार केला जाऊ लागला. गर्भवती स्त्रीवर दुसऱ्या व चौथ्या महिन्यात हा संस्कार केल्यास तिला पुत्र होतो ही समजूत होती.

**३) सिमंतोन्नयन** –

गर्भार स्त्रीच्या गर्भावर मातेच्या मानसिक अवस्थेचा परिणाम होतो ही आपली जुनी समजूत होय. या समजुतीला आज मानसशास्त्रीय आधारही लाभला आहे. गर्भार काळात स्त्री शारीरिक व मानसिकदृष्ट्या जितकी स्वस्थ असेल तितका गर्भ स्वस्थ निपजतो. म्हणून या काळात गर्भार स्त्रीची चित्तवृत्ती प्रफुल्लित राहणे आवश्यक असते. त्यासाठी तिची प्रत्येक इच्छा पूर्ण व्हावी म्हणूनच अनेक संस्कार केले जातात. सिमंतोन्नयन हा त्या संस्कारांपैकीच एक संस्कार होय.

**४) जातकर्म –**

मूल जन्माला आल्याबरोबर हा संस्कार करतात. मूल मातेच्या सोने उगाळून मुलाला चाटविणे, तसेच बालकाचे अवघाण करणे. मूल निरोगी व उदरातून बाहेर आल्यानंतर त्याला शुद्ध करणे व मध आणि तूप यांच्या मिश्रणात दीर्घायुष्यी व्हावे म्हणून हा संस्कार केला जातो.

**५) नामकरण**

यालाच बारसे म्हणतात. मुलाच्या जन्माच्या १२ व्या दिवशी विधीपूर्वक त्याचे नाव ठेवण्याचा संस्कार होत असे. तिसऱ्या किंवा चौथ्या महिन्यात देवदर्शनाच्या निमित्ताने त्याला प्रथमच घराबाहेर नेण्यात येते. त्यावेळी हा संस्कार करतात. घराबाहेरील दुष्ट व अमंगल शक्तींचा मुलाला

**६) निष्क्रमण -** निष्क्रमण म्हणजे घराबाहेर पडणे. मूल जन्माला आल्यानंतर उपसर्ग पोहोच नये हा यामागचा उद्देश आहे.

**७) अन्नप्राशन** मूल साधारणतः सहा महिन्यांचे झाले की शुभमुहूर्त पाहून त्याला प्रथमच दुधभातासारखे अन्न भरविले जाई. तेव्हा हा संस्कार करीत.

**८) चूडाकर्म अथवा चौल** मूल मातेच्या गर्भातून बाहेर आल्यावर त्याने - शुद्धीकरण होई मूल ८ महिन्यांचे झाल्यावर ते २ वर्षांचे होईपर्यंत त्याच्या डोक्यावरचे सर्व केस काढून टाकीत. यामुळे शुद्धीकरणाची अपूर्ण राहिलेली प्रक्रियापूर्ण होत असे. यालाच 'जावळ' काढणे असेही म्हणतात.

**९) कर्णवेधण** मूल लहान असताना त्याचे कान टोचत. आजही ही हिंदुत्वाची खूण समजली जाते.

**१०) उपनयनसंस्कार -** उपनयनसंस्कार म्हणजे मौंजविधी. ब्राह्मणात हा ८ व्या वर्षी, क्षत्रियात १० व्या वर्षी तर वैश्यात १२ व्या वर्षी होत असे. या संस्कारानंतर मुलगा यज्ञोपवित (जानवे) धारण करीत असे. या संस्कारानंतर मुलगा गुरूच्या आश्रमात शिक्षण घेण्यासाठी जात असे. शिक्षण काळात अत्यंत साधे व व्रतस्थ आचरण असल्याने या संस्काराद्वारे मुलावर आचरणाची अनेक कडक बंधने लादली जात.

**११) मेधाजनन -** मेघा म्हणजे तीव्र बुद्धी, अलौकिक बुद्धी. मुलगा मेधावी। व्हावा म्हणून त्याला वटवृक्षाची पूजा करण्यास सांगितले जाई. वटवृक्ष हे ज्ञानाचे प्रतीक समजले जाते.

**१२) केशांत** मुलगा १६ वर्षांचा झाला की त्याच्या डोक्यावरचे सर्व केस काढून टाकत तेव्हा हा संस्कार केला जाई.

**१३) समावर्तन -** गुरूगृही शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थी स्वगृही येत असे. तो घरी जाण्यापूर्वी हा संस्कार करीत. आजच्या पदवीदान समारंभासारखे या संस्काराचे स्वरूप असे. यावेळी गुरू शिष्याला मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग जनकल्याणासाठी करण्याचा उपदेश करून आशीर्वाद देत असे. शिष्य ऐपतीप्रमाणे गुरूला गुरूदक्षिणा देत असे.

**१४) विवाह -** हा अत्यंत महत्त्वाचा व पवित्र संस्कार होय. शिक्षण पूर्ण झाल्यावर मुलगा विवाह करून गृहस्थाश्रमात प्रवेश करीत असे. विवाहाच्या वेळी पाणिग्रहण, लाजाहोम, सप्तपदी इ. विधी अग्नीला साक्षी ठेवून केले जात. या प्रसंगी वधूवराना मंत्रोच्चाराद्वारे अनेक शपथा घ्याव्या लागत. यानुसार मनुष्य धर्मानुसार अर्थ व काम यांचा उपभोग घेण्यास मोकळा असे.

**१५) अग्निपरिग्रह -** आर्यांच्या एकूण जीवनातच अग्नीला अत्यंत महत्व होते. त्यामुळे त्यांच्या धार्मिक जीवनातही अग्नीला महत्त्व प्राप्त झाले. विवाहानंतर गृहस्थाला घरात रोज अग्नी प्रज्वलीत करून अग्निपूजा (होम) करावी लागे. परिग्रह म्हणजे साठा. अग्निपरिग्रह म्हणजे अग्नी सतत प्रज्वलित ठेवणे

**१६) अंत्येष्टी** मानवाच्या मृत्यूनंतर त्याच्या पार्थिवावर करण्यात येणारा हा शेवटचा संस्कार होय. यांत विशिष्ट क्रिया करून व विशिष्ट मंत्रोच्चारात प्रेताचे दहन करण्यात येते. मृतात्म्याला सद्गती लाभावी म्हणून मृत्यूनंतर बारा दिवस निरनिराळे संस्कार करण्यात येतात. यांत पिंडदान, अस्थिविसर्जन, श्राद्ध इ. महत्त्वाचे विधी आहेत. अशा रीतीने मूल मातेच्या उदरात असल्यापासून म्हणजे त्याच्या जन्माच्या पूर्वीपासून त्याच्या मृत्यूपर्यंत हे सोळा संस्कार केले जातात.

**पुरुषार्थ**

विवाहाद्वार मनुष्य गृहस्थाश्रमात प्रवेश करतो. या भागात गृहस्थ म्हणून त्याला काही कर्तव्यांचे पालन करावे लागते. या कर्तव्यांनाच पुरुषार्थ म्हटले आहे. ही कर्तव्ये चार आहेत. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष धर्म, अर्थ आणि काम यांचे पालन गृहस्थाश्रमात आणि मोक्ष या कर्तव्याचे पालन वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रमात करावे असा संकेत आहे. पुरुषाथचि योग्य पालन करणे हेच मनुष्य धर्माचे ध्येय आहे. यांच्या पालनाने जीवनाला अर्थ प्राप्त होतो.

**१) धर्म -** अनेक लोक धर्म या शब्दाचा चुकीचा अर्थ लावतात. धर्म म्हणजे ज्यामुळे समाजाची धारणा होते, त्याचा काभार सुरळीतपणे चालण्यास मदत होते असे आचरणाचे नियम. धर्म म्हणजे सदाचार. सामाजाने जे नीतिनियम आखून दिले त्यानुसार वागणे म्हणजे धर्माचरण समाजाने प्रत्येकाची कर्तव्ये निश्चित केली आहेत. आपापल्या कर्तव्यानुसार वागणे म्हणजे धर्माचरण.

**२) अर्थ -** संसाराचा उपभोग घेण्यासाठी अर्थ म्हणजे पैसा हवा. माणसाच्या अन्न, वस्त्र, निवारा या भौतिक गरजा भागविण्यासाठी पैसा हवा. आपल्या कुटुंबाच्या या गरजा चांगल्यात चांगल्या रीतीने पूर्ण करणे हे प्रत्येक पुरुषाचे कर्तव्य आहे. त्यासाठी प्रत्येक पुरुषाने आपल्या कुवतीनुसार (शारीरिक व बौद्धिक) द्रव्यार्जन करायला हवे. परंतु हे द्रव्यार्जन समाजमान्य मार्गांनीच करायला हवे व ते समाजमान्य मार्गांनीच खर्च करायला हवे. योग्य मार्गांनी संपत्ती मिळवून ती योग्य कारणांसाठी खर्च करणे म्हणजे अर्थाचे पालन करणे होय.

**३) काम -** काम ही नैसर्गिक प्रेरणा असून तिचा उपभोग घेण्याचा प्रत्येकाला निसर्गदत्त अधिकार आहे. ही प्रेरणा जेव्हा वासना बनते तेव्हा ती विकृती धारण करते. स्वैर बनते तेव्हा मनुष्य व पशूत काहीच फरक उरत नाही. काम म्हणजे वैवाहिक हा विकृती टाळण्यासाठीच विवाहसंस्था, कुटुंबसंस्था निर्माण झाल्या. कामप्रेरणा जेव्हा जीवनाचा उपभोग हा उपभोग समाजाच्या नीतिनियमांच्या चौकटीत राहून घेतला तरच या प्रेरणेतील सौंदर्य आणि पावित्र्य टिकून राहते. मुक्त काम अनेक आपत्तींना जन्म देते. सामाजिक नीतिमत्तेची बंधने पाळून स्त्रीसुखाचा आस्वाद घेणे म्हणजे काम.. त्याच्या प्राप्तीसाठी अविरत धडपडणे व त्या प्राप्तीअभावी दु:खी कष्टी होणे हे अज्ञानातून

**४) मोक्ष-** मोक्ष म्हणजे मुक्ती, सुटका. भौतिक सुखालाच खरे सुख मानून पडत असते. हे अज्ञान दूर करणे, त्यातून मुक्त होणे म्हणजे मोक्ष मनुष्याला सत्मनुष्य आणि असत् यातील फरक कळला की तो संसारसुखाच्याही पलीकडे जे शाखत सुख आहे त्या सुखानी कारखान केलेल्या चौकटीत राहून धर्म, अर्थ व काम यांचा उपभोग घेतला म्हणजेच मोक्षपदासाठी पात्र ठरतो.

**आहार**

ऋग्वेदकाळातील आहार आणि उत्तर वैदिक काळातील आहार यांत विशेष फरक नव्हता. उत्तर वैदिक काळातही गहू, जव, तीळ, तांदूळ, निरनिराळया भाज्या, फळे, दूध, दही, तूप इ. पदार्थाचा आहारात समावेश असे. 'अपूप', 'पायस' इ पक्वानांची नावे वैदिक वाङ्मयात आढळतात. जैन व बौद्धधर्माच्या उदयामुळे मांसाहार, मद्यपान कमी झाले होते परंतु विशेष प्रसंगी किंवा अतिथीचा पाहुणचार करताना बैल, बकरी यांच्या मांसाचाही आहारात आवर्जून उपयोग होत असे

**वेशभूषा व केशभूषा**

वेशभूषा व केशभूषेतही विशेष फरक पडला ना सुतौ, गरम आणि रेशमी वस्त्रांचा वापर प्रामुख्याने होत असे. रंगबेरंगी वस्त्रे वापरण्याची प्रवृत्ती या काळात वाढली होती. यज्ञाच्या वेळी विशिष्ट प्रकारचे ऊनी आणि रेशमी वस्त्र आणि पगडी वापरली जाई पशूच्या कातड्यापासून बनविलेली वस्त्रे आणि पादत्राणेही वापरली जात स्त्री व पुरुष दोघेही लांब केस ठेवीत सुगंधित तेलाचा वापर केला जात असे. स्त्रिया निरनिराळ्या प्रकारच्या केसांच्या रचना करीत केसांची योग्य निगा राखली जात असे. चंदन, उटणी, काजळ यांचा सर्रास उपयोग होत असे. स्त्री व पुरुष सोने व चांदीपासून बनविलेल्या निरनिराळ्या अलंकारांचा सौदर्यवृद्धीसाठी वापर करीत वैदिककाळातील अलंकार याही काळात वापरले जात.

**मनोरंजनाची साधने**

आर्यांचे जीवन उत्साहाने ओतप्रोत भरले होते. जीवनातील आनंद शतगुणित करण्यासाठी रथ व घोड्यांच्या शर्यती, प्राण्यांच्या झुंजी, शिकार,जुगार, सोंगटया, नृत्य, संगीत इ. मनोरंजनाच्या साधनांचा वापर केला जाई. या काळात नाटकाचीही सुरुवात झाली असावी. संगीत व नृत्याच्या वेळी निरनिराळ्या घन व तंतुवाद्यांचा उपयोग केला जात असे. वाद्यात वीणा, शंख, मृदंग इ चे उल्लेख आढळतात.

**क) आर्थिक जीवन**

ऋग्वेदकाळापेक्षा उत्तर वैदिककाळात आर्याच्या आर्थिक जीवनात बराच बदल घडून आला.

**शेती व पशुपालन**

या काळात शेती हा आर्यांचा मुख्य व्यवसाय होता. ती लोकसंख्या लक्षात घेऊन नवीन जमीन लागवडीखाली आणली गेली. या काळात अर्थ गंगा-यमुनेच्या परिसरात स्थायिक झाले होते. हा सर्व प्रदेश सुपीक असल्याने वेड्या परिश्रमाने भरपूर धान्य पिके. गहू, तांदूळ, जव, तीळ, कापूस, निरनिराळी जे व भाज्या ही मुख्य पिके होती. शेतीसाठी शेणखताचा वापर केला जाई. या काळात नांगराच्या

आकारातही लक्षणीय वाढ झाली होती. वैदिक साहित्यात सहा ते बोवीस बैलांच्या नांगराचे उल्लेख आढळतात. पावसाच्या पाण्याबरोबरच विहिरी आणि यांच्या कालव्यांच्या पाण्याचाही शेतीसाठी उपयोग केला जाई. अतिवृष्टी, अवर्षण, मैडधाड इ. नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना नेहमी तोंड द्यावे लागे कसेल त्याची योन हे तत्त्व होते परंतु जमीनदारी प्रथा हळूहळू मूळ धरत होती. शेतीसाठी पशूंचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असल्याने व पशूंपासून दूध, कातडी व मांस मिळत असल्याने तसेच रथ, गाड्या इ ओढण्यासाठी पशूचा उपयोग क्षेत असल्याने पशुपालन व्यवसाय हा शेतीला पूरक म्हणून मोठ्या प्रमाणात सुरू झाला. या सर्व प्राण्यात गाय ही सर्वात उपयुक्त असल्याने ती पवित्र व म्हणून अवध्य गली. इतर प्राण्यांत बैल, म्हैस, बकरी, उंट, घोडा, हत्ती इ. प्राणी पाळले जात.

**उद्योगधंदे –**

या काळात वर्णव्यवस्थेत बराच कर्मठपणा आला होता. वर्णव्यवस्थेतूनच तीव्यवस्था निर्माण होऊन तिची मुळे खोलवर रुजू लागली होती. व्यवसाय जातीनिष्ठ सून त्यात वंशपरंपरेचे तत्त्व जोर धरू लागले होते. जितक्या जाती तितके त्यांचे व्यवसाय निर्माण झाले. पारधी, लोहार, सुतार, कुंभार, सोनार, शिंपी, धोबी, न्हावी, कोळी, वाढई, रंगारी, विणकर इ. प्रमुख व्यवसाय त्या काळात होते. सुती, ऊनी, रेशमी वस्त्र तयार करणे, त्यांना रंग देणे, त्यावर नक्षीकाम करणे ती व्यवसाय अतिशय तेजीत होता. तसेच मातीपासून निरनिराळ्या आकाराची भांडी तयार करणे, त्यांना भाजणे, रंग देणे व त्यावर निरनिराळे नक्षीकाम करणे हाही व्यवसाय होता. निरनिराळे धातू गाळणे, त्यापासून अवजारे, शस्त्रास्त्रे, भांडी, सुबक अलंकार तयार करणे या क्षेत्रातही आर्यांनी भरीव प्रगती केली होती...

**व्यापार**

निरनिराळ्या वस्तूचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या श्रेणी या काळात झाल्या होत्या. या श्रेणी किंवा व्यापारी संघ आपापल्या व्यवसायाच्या हितसंबंधाची शिक कृष्णल या मुद्रांचा उल्लेख आढळतो. परंतु निश्चित माहिती मिळत नाही. निर्माण लव खुष्की या दोन मार्गांनी होत असे. व्यापारात वस्तुविनिमयाचे तत्त्व असावे. घेत देशांतर्गत व परदेशी असा दोन्ही प्रकारचा व्यापार चालत असे या काळात मोठे व्यापारी व सावकारांचा वर्ग तयार होऊ लागला. धान्य, भाड कापड यांचा प्रामुख्याने व्यापार होत असे.

**ड) धार्मिक जीवन-**

उत्तर वैदिक काळात आर्याच्या धार्मिक जीवनात फार मोठे परिवर्तन आले. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे आहे. देवता या काळात ऋग्वेदकालीन देवतांचे महत्त्व कमी होऊन त्यांची जागा वनदेवतांनी घेतली. अनार्यांशी संपर्क आल्याने आर्यांनी अनार्या अनेक स्वीकारल्या. त्यापैकी एक म्हणजे रूद्र' ही देवता होय. ही देवता उत्तर वैदिक काळ 'शिव' या नावाने ओळखली जाऊ लागली. रूद्र ही क्रोधायमान देवता आता शिव म्हणजे मांगल्याची देवता झाली. ऋग्वेदकाळात इंद्र आणि वरुण या सर्वश्रेष्ठ देवता मानल्या जात उत्तर वैदिक काळात त्यांची जागा 'विष्णू' या देवतेने घेतली विष्णूला सूर्यांचे रूप मानण्यात आले. ऋग्वेदकालीन देवतांच्या जागी नवीन टेक्न येत असल्या तरी जुन्या देवदेवतांविषयी जनसामान्यात अजूनही श्रद्ध होती..

**यज्ञसंस्थेचे स्वरूप –**

ऋग्वेदकाळी यज्ञविधी हा अत्यंत साधा व सोपा होत कुणालाही घरच्या घरी यज्ञ करता येत असे. यज्ञ हे सुखसंपत्तीचे साधन समझते जाई परंतु उत्तर वैदिक काळात यज्ञाचे साधे स्वरूप नाहीसे होऊन त्यात क्लि आली यज्ञाचे अवास्तव स्तोम माजून त्यात नवनवीन यज्ञांची भर पडली. लहानसहान गोष्टींच्या प्राप्तीसाठी यज्ञ आवश्यक झाले. प्रत्येक यज्ञाचा स्वतंत्र विधी होऊन से किचकट नियमांनी बद्ध झाला. त्यात थोडीदेखील सूट किया तडजोड मान्य नसे. यज्ञाचा पसारा इतका वाढला की एका व्यक्तीला एकट्याने घरच्या घरी यज्ञ करणे कठीण होऊन बसले. साध्या लहान यन्त्रासाठीही प्रचंड साहित्य व एकापेक्षा ज पुरोहितांची गरज भासू लागली. काही यज्ञ तर वर्षानुवर्षे चालत आतापर्यंत यज्ञ है। इच्छित फलप्राप्तीचे साधन समजले जात परंतु या काळात यज्ञ साधन न राहता साध यनले यज्ञ करणे हे महत्त्वाचे कार्य बनले. एवढेच नव्हे तर यामुळे देवतांच अंगी देवत्व येते असा समज या काळात झाला. त्यामुळे यज्ञांना देवतांपेक्षाही महन्द प्राप्त झाले. वन करारा जन्म-मृत्यूच्या फेन्यातून मुक्त होऊन मोक्षपदाला पोहे अशी त्या काळात धारणा झाली.

सुरुवातीचे यज्ञ साधे, कमी खर्चाचे व घरच्या घरी पुरोहिताच्या मदतीविना करता येत असत. परंतु यज्ञविधीत क्लिष्टता येताच यज्ञासाठी लागणारा वेळ व खर्च वाढला काही यह महिनामहिने व वर्षानुवर्षे चालत. त्यासाठी आहुती म्हणून अन्नधान्य व इतर साहित्यांच्या प्रचंड राशी लागू लागल्या. यज्ञप्रक्रियेचे अनेक विभाग करण्यात येऊन प्रत्येक विभागसाठी एका एका पुरोहिताची निवड होऊ लागली. मोठ्या प्रमाणात पशुंचे बळी दिले जाऊ लागले. अज्ञात राजे-महाराजे सुरुवातीला ६०९ पशूचा बळी देत. ब्राह्मणांना भरमसाट दक्षिणा वाटत. यामुळे सर्वसामान्य माणसाला यज्ञ करणे अशक्य झाले. यज्ञ केवळ धनिकवर्गाची मिरासदारी बनली.. अंधश्रद्धांचे प्राबल्य - जेव्हा जेव्हा साधनांचे महत्त्व वाढून साध्य मागे पडते, साधनांनाच साध्य मानले जाऊ लागते तेव्हा तेव्हा साध्यातील पावित्र्य, उदात्त तत्त्व मागे पडते,

नाहीसे होते. विधींची पूर्तता एवढाच उपचार जेथे उरतो तेथे कर्मकांडाचे स्तोम माजते. अंधश्रद्धा हे कर्मकांडाचे अपत्य आहे. कर्मकांडाबरोबर अंधश्रद्धा ही अपरिहार्य आहे.

उत्तर वैदिक काळात यज्ञात मंत्राबरोबर तंत्राचेही प्रस्थ निर्माण झाले. मंत्र आणि तंत्राद्वारे केवळ सामान्य माणसालाच नव्हे तर भूत, प्रेतात्मे, देवी-देवता यांना वशीभूत करून, स्वतःच्या तालावर हवे तसे नाचवता येते. परंतु त्यासाठी विधीतील नियमांचे काटेकोर पालन आवश्यक आहे, अशी समजूत निर्माण झाली. विधीनियमांच्या नावाखाली अनेक दुर्मिळ वस्तूंचा व जटिल क्रियाकलापांचा समावेश यज्ञात करण्यात आला. यामुळे यज्ञातील साधेपणा नष्ट होऊन दुर्मिळ साहित्य गोळा करणे यालाच महत्त्व प्राप्त झाले. यज्ञापेक्षा यज्ञाची तयारी अधिक महत्त्वपूर्ण ठरली. विधींची क्लिष्टता, त्याचे अवडंबर यालाच धर्म मानण्यात येऊ लागले.

**पुरोहितांचे वर्चस्व –**

उत्तर वैदिक काळात यज्ञाचे स्वरूप किचकट झाल्याने सामान्य माणसाला पुरोहिताच्या मदतीशिवाय यज्ञ करणे अशक्य झाले. प्रत्येक यज्ञाच्या विधीचे परिपूर्ण ज्ञान असलेला तज्ज्ञ पुरोहितांचा वर्ग तयार झाला. यज्ञ करणे हा पुरोहितांचा व्यवसाय बनला व तो वंशपरंपरेने चालू लागला.संपत्ती, संतती, दीर्घारोग्य, शत्रुचा नाश, भरघोस पीक, मोक्ष इ. ऐहिक आणि पारलौकिक सुखासाठी यज्ञ केले जात. पुरोहितांनी यज्ञ केले तरच यजमानाला या सुखाची प्राप्ती होत असे. पुरोहितावर अधिकाधिक अवलंबून राहू लागला. पुरोहित हा यजमान व त्याचे इप्सित यातील मध्यस्थ बनला. त्यामुळे पुरोहिताचे समाजात अतोनात महत्त्व वाढले. स्वतःचे महत्त्व वाढविण्यासाठी व वाढविलेले महत्त्व टिकविण्यासाठी पुरोहितांनी धार्मिक विधी अधिकाधिक क्लिष्ट करून या क्षेत्रात स्वतःचा एकाधिकार निर्माण केला. या काळात पुरोहितांचे वर्चस्व अतोनात वाढल्याने या काळाला 'ब्राह्मणयुग' असेही म्हणण्यात येऊ लागले..